दै. गोदातीर दि. 05/03/25

# महानगरपालिका व शहर वाहतूक शाखेकडून शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम सुरु



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात वाढत असलेल्या वाहतूक समस्या दूर करण्यासाठी अनाधिकृत अतिक्रमणाविरुध्द दि. ३ मार्च रोजी महानगरपालिका व शहर वाहतूक शाखा यांच्यावतीने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्यात आली.

शहरातील वाहतूक समस्या दूर करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या उपस्थितीत महानगरपालिका यांचे अतिक्रमण हटाव पथक व शहर वाहतूक शाखा येथील पोलीस निरीक्षक साहेबराव गुट्टे व पोलीस अंमलदार यांनी अनाधिकृत अतिक्रमण हटाव संयुक्त मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत महावीर चौक, सोनू कॉर्नर, वजिराबाद चौक, आयुर्वेदिक कॉलेज एस.टी.ओवर ब्रिजपर्यंत दोन्ही बाजुला असलेले फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, किरकोळ कटलेरी सामान विक्रेते यांचे हातगाडे तसेच फुटपाथवर ठेवलेले साहित्य काढून टाकण्यात आले आहे.

तसेच यापुढे महावीर चौक, सोनू कॉर्नर, वजिराबाद चौक, आयुर्वेदिक कॉलेज एस.टी. ओवरब्रिज दरम्यान फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, किरकोळ कटलेरी सामान विक्रेते यांचे हातगाडे तसेच फुटपाथवर ठेवलेले साहित्य अनाधिकृत अतिक्रमण करुन बसणार नाहीत, हातगाडे लावणार नाहीत याबाबत पोलीस आणि महानगरपालिका प्रशासन यांनी सक्त सुचना दिल्या आहेत.

या सोबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याशी समन्वय साधून तिथे सायकल ट्रॅक काढून टाकला जाईल. तसेच यानंतर सदर ठिकाणी फळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते, किरकोळ कटलेरी सामान विक्रेते यांचे हातगाडे फुटपाथवर आढळून आल्यास त्यांच्यावर सक्त कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस आणि महानगरपालिका प्रशासन यांनी दिला आहे.